“पुनर्रचित (Revamped) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान” राबविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः राग्रास्वअ- २०२२/प्र.क्र.४०/आस्था-१५
बांधकाम भवन, २५,मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक: १६ सप्टेंबर, २०२२

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः रागांपं- २०१२ /प्र.क्र.९२ /योजना-४, दि. ३ मार्च, २०१४
२) शासन निर्णय क्रमांक: राग्रास्वअ - २०१८/प्र.क्र.१२१/आस्था-१५, दि. २० फेब्रुवारी, २०१९
३) शासन पत्र क्र. राग्रास्वअ २०२२/प्र.क्र.४९/आस्था १५, दि.१३ जुलै २०२२
४) Framwork for implementaion of CSS of Revamed Rashtriy Gram Swaraj Abhiyan (2022-23 to 2025-26)

प्रस्तावना -

केंद्र शासनाने १२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत विविध कार्यक्रमांचे एकत्रिकरण करुन पंचायतीराज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी “राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान” हा एकछत्री कार्यक्रम सन २०१३ - २०१८ या कालावधीत राबविला. संदर्भाधिन क्र. १ येथील दि.०३.०३.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर केंद्र पुरस्कृत अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सन २०१८-२०१९ या कालावधीसाठी या योजनेचे पुनर्गठन करुन “राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान” ही केंद्र पुरस्कृत योजना संदर्भ क्र. २ येथील दि.२०.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. या योजनेचा कालावधी सन २०२१-२०२२ पर्यंत असल्यामुळे केंद्र शासनाने या योजनेमध्ये काही सुधारणा करुन संदर्भ क्र. ४ अन्वये “पुनर्रचित (Revamped) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान” अशी योजना जाहिर केलेली आहे. या योजनेची अंमलबजावणी दि.०१.०४.२०२२ ते दि.३१.०३.२०२६ या कालावधीमध्ये करावयाची आहे. सदर योजना केंद्र शासन पुरस्कृत असून या योजनेच्या निधीचे प्रमाण हे केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% असे आहे. सदरची केंद्र पुरस्कृत **“पुनर्रचित ( Revamped) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान** (RGSA)” योजना राज्यामध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी, विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. तथापि, संदर्भ क्र. १ व २ येथील शासन निर्णयामधील मनुष्यबळ निर्मितीच्या बाबीवर एकसुत्रता आणून “पुनर्रचित (Revamped) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान” या योजनेबाबत सर्वंकष सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

“राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान” या योजनेमध्ये सुधारणा करुन, केंद्र शासनाने जाहीर केलेली **“पुनर्रचित ( Revamped) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान”** ही योजना सन २०२२-२३ पासुन राज्यात राबविण्यात येईल.

<u>अभियानाची उद्दीष्टे</u> :-

१) शाश्वत विकासाची ध्येये (Sustainable Development Goals) साध्य करण्यासाठी पंचायत राज संस्थांमध्ये सुप्रशासन क्षमता विकसित करणे.
२) पंचायत राज संस्थांमधील, ग्रामपंचायत या तिसऱ्या व निम्नतम स्तरावरील लोकप्रतिनिधींमध्ये नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी क्षमता बांधणी करणे.
३) महत्वाच्या राष्ट्रीय समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपलब्ध साधन सामुग्रीचा पुरेशा प्रमाणात वापर, विविध योजनांचे अभिसरण (Convergance) आणि सर्वसमावेशक स्थानिक सुप्रशासनासाठी पंचायतींची क्षमता वृध्दींगत करणे.
४) पंचायतराज संस्थांच्या स्वत:च्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी त्यांची क्षमता बांधणी करणे.
५) पंचायतराज व्यवस्थेमध्ये पारदर्शीपणा व उत्तरदायित्व आणण्यासाठी आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी ग्रामसभांचे बळकटीकरण करणे.
६) भारतीय राज्य घटना व पेसा कायदा १९९६ मधील तरतुदी व उद्दिष्टे विचारात घेऊन पंचायतराज संस्थांना अधिकार व जबाबदाऱ्यांचे हस्तांतरण करणे.
७) पंचायतराज संस्थांना प्रशिक्षण, सक्षमीकरण व मार्गदर्शन करण्यासाठी उत्कृष्ट संस्थांचे जाळे निर्माण करणे.
८) पंचायतराज संस्थांमधील विविध पातळीवर क्षमता वाढीसाठी संस्थांना बळकटी देणे आणि त्यांना मुलभूत सुविधा, मानव संसाधनांची उपलब्धता आणि त्यांचे परिणामकारक प्रशिक्षण यांची दर्जेदार मानके साध्य करण्यासाठी सक्षमीकरण करणे.
९) पंचायतराज संस्थांमध्ये जबाबदार व पारदर्शक सुप्रशासन, प्रशासकीय कार्यक्षमता व सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी ई-गव्हर्नन्स व इतर तंत्रज्ञान आधारित उपाययोजना करणे.
१०) पंचायतराज संस्थांच्या शाश्वत विकासाची ध्येयपुर्ती (Sustainable Development Goals) व इतर कामगिरीची दखल घेवून प्रोत्साहनपर बक्षिसे देणे.
११) प्रचार, प्रसार व प्रसिध्दीच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील सर्व भागीदार घटकांची क्षमतावृध्दी करणे.
१२) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांच्या माध्यमातून माहिती, संकल्पना व उपक्रमांची देवाणघेवाण करणे.

<u>अभियानाची अंमलबजावणी</u> :-

उपरोक्त उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांची क्षमताबांधणी, तज्ञ मनुष्यबळ उपलब्धता, पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी **" पुनर्रचित (Revamped) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान**" ही योजना राज्यात सर्वत्र राबविण्यात येणार आहे.

शाश्वत विकासाच्या ध्येयांचे स्थानिकीकरण, ग्रामपंचायत विकास आराखडे, पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडे तयार करण्यासाठी क्षमताबांधणी, त्याचबरोबर निती आयोगाने निवडलेल्या देशातील ११५ महत्वाकांक्षी जिल्ह्यांमधील (Aspirational Districts) राज्यातील नंदुरबार, उस्मानाबाद, वाशिम व गडचिरोली या चार जिल्हे आणि मिशन अंत्योदय अंतर्गत निवडलेल्या समुहातील (Clusters) लोकप्रतिनिधींची क्षमताबांधणी, लक्षवेध पंचायतींना (Panchayat Learning Centers) विशेष सहाय्य, पेसा क्षेत्रासाठी विशिष्ट संरचना, प्रचार व प्रसिध्दी, नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन, आर्थिक विकास व उत्पन्न वृध्दीसाठी लघु उद्योगांना आवश्यक निधीच्या कमतरतेची पूर्तता इत्यादी बाबींवर विशेषत्वाने भर देण्यात येईल. त्यासाठी खालीलप्रमाणे उपक्रम सुरु करण्यात येत आहेत.

१) <u>प्रशिक्षण व क्षमताबांधणी</u> :-

१.१. राज्यातील पंचायत राज संस्थांची संख्या, त्यामध्ये कार्यरत असलेले लोकप्रतिनिधी व अधिकारी/ कर्मचाऱ्यांची संख्या, स्थानिक स्वराज संस्थांकडे हस्तांतरित केलेले व करावयाचे विविध विषय, संस्थांचे व्यवस्थापन, आर्थिक बाबी, शाश्वत विकासाच्या ध्येयांचे स्थानिकीकरण, विविध योजनांचे अभिसरण (Convergance) आणि सर्वसमावेशक स्थानिक सुप्रशासनासाठी पंचायतीची क्षमता वृध्दींगत करणे, सामाजिक अभिसरण (Social Mobilisation) इ. बाबी विचारात घेवून प्रशिक्षण व क्षमताबांधणीचा वार्षिक आराखडा राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD) व राज्य पंचायत संसाधन केंद्र (SPRC) यांनी तयार करावा. त्यासाठी प्रामुख्याने खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१) पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांनी विकसित केलेल्या National Capability Building Framework (NCBF) आधारित प्रशिक्षण व क्षमताबांधणीचे उपक्रम घ्यावेत.
२) केंद्र शासनाच्या पंचायती राज मंत्रालयाने शाश्वत विकासाच्या ध्येयांच्या स्थानिकीकरणासाठी नऊ संकल्पना - गरिबी मुक्त आणि उपजीविका (रोजगार) वृद्धीस पोषक गाव, आरोग्यदायी गाव, बालस्नेही गाव, जल समृद्ध गाव, स्वच्छ आणि हरित गाव, स्वयंपूर्ण पायाभूत सुविधायुक्त गाव, सामाजिकदृष्ट्या सुरक्षित गाव, सुशासनयुक्त गाव, लिंग समभाव पोषक गाव/महिलास्नेही गाव - बाबत प्रशिक्षण व क्षमता बांधणी उपक्रम राबवावेत.
३) Aspirational Districts (नंदूरबार, उस्मानाबाद, वाशिम व गडचिरोली) व मिशन अंत्योदय ग्रामपंचायतींमधील नव्याने निवडून आलेले लोकप्रतिनिधी व अधिकारी / कर्मचाऱ्यांचे क्षमता बांधणी व प्रशिक्षण उपक्रम राबवावेत.
४) प्राथमिक आरोग्य व लसीकरण, आहार, शिक्षण, स्वच्छता, जलसंधारण इत्यादी राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांबरोबरच नेतृत्व विकास, स्थानिक नियोजन, कार्यालय व्यवस्थापन, स्वउत्पन्नाचे स्रोत निर्मिती, विविध योजनांची अंमलबजावणी व देखरेख, महिला सक्षमीकरण इ. विषयांचा समावेश प्रशिक्षण व क्षमताबांधणी कार्यक्रमामध्ये करावा.
५) नव्याने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे परिचय प्रशिक्षण (Orientation Training) निवडणुकीनंतर शक्यतो ६ महिन्यात व त्यांचे उजळणी प्रशिक्षण (Refresher Training) निवडून आल्यानंतर २ वर्षात घ्यावे.
६) महिला लोकप्रतिनिधी व वंचित घटकातील लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षणासाठी विशेष लक्ष द्यावे.
७) "आमचं गाव आमचा विकास" अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडे, पंचायत समिती विकास आराखडे व जिल्हा परिषद विकास आराखडे तयार करणे, अंमलबजावणी करणे व इतर पैलूंसाठी पंचायत राज संस्थांचे लोकप्रतिनिधी, अधिकारी/कर्मचारी व इतर भागीदार घटकांसाठी प्रशिक्षण घ्यावे.
८) पंचायत राज संस्थांमधील लोकप्रतिनिधी, अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी राज्यांतर्गत व राज्याबाहेर अभ्यास दौरे आयोजीत करावेत.

९) यशदा स्तरावर प्रशिक्षण गरजा विश्लेषण, मोडयूल, वाचन साहित्य तयार करावे. राज्यस्तरीय प्रविण प्रशिक्षकांची निवड यशदा स्तरावर करण्यात यावी. जिल्हा व क्षेत्रीय प्रविण प्रशिक्षकांची निवड जिल्हा पातळीवर करण्यात यावी. विविधस्तरीय प्रविण प्रशिक्षकांचे प्रशिक्षण यशदा स्तरावर पूर्ण करण्यात यावे. यामध्ये क्रांतीज्योती, सूक्ष्मनियोजन, पंचायत प्रक्रिया व सुप्रशासन, विकेंद्रीकरण, पेसा, ई-पंचायत यांच्या प्रविण प्रशिक्षकांचा व त्रिस्तरीय साधन व्यक्ती यांचा समावेश राहील.

१०) जिल्हा व पंचायत समिती स्तरावरील लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांचे आणि ग्रामपंचायतीचे सरपंच यांचे प्रशिक्षण यशदा स्तरावर घेण्यात यावे. जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण जिल्हा स्तरावर व उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक व इतर ग्रामस्तरीय कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण जिल्हा पंचायत संसाधन केंद्र, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, पंचायत राज प्रशिक्षण केंद्र व तालुका स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत घेण्यात यावे.

११) नव्याने निवडणूका झालेल्या ग्रामपंचायतीमधील महिला ग्रामपंचायत सदस्यांसाठी "क्रांतीज्योती" मोड्युलच्या धर्तीवर विशेष प्रशिक्षण घेण्यात यावे. यासाठी विशिष्ट प्रशिक्षण मोड्यूल, वाचन साहित्य व तज्ञ प्रशिक्षक इत्यादी बाबींची पूर्तता करण्यात यावी. या माध्यमातून नव्याने निवडून आलेल्या महिला ग्राम पंचायत सदस्यांना संवेदनशील करण्याचा प्रयत्न करावा.

१२) पेसा क्षेत्रातील ग्राम पंचायतीमध्ये "पेसा" कायद्याशी सुसंगत व अनुरुप प्रशिक्षण देण्यात यावे. "पेसा" अंतर्गत कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. पेसा क्षेत्रातील ग्राम सभा संचेतनासाठी विशिष्ट उपक्रम घेण्यात यावेत.

१३) मॉडेल ग्रामपंचायतींना Peer / Panchayat Learning Centers (PLCs) म्हणून विकसित करण्यात यावे.

१४) प्रशिक्षण व क्षमताबांधणी कार्यक्रमाचे फलनिष्पत्तीवर आधारित मूल्यमापन करण्यात यावे. सदर प्रशिक्षण व क्षमताबांधणीचा वार्षिक आराखडा राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) मार्फत राज्य व केंद्र शासनास सादर करण्यात येईल.

१.२ पंचायत राज संस्थांचे प्रतिनिधी व अधिकारी / कर्मचारी यांच्या राज्य, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरीय प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमासाठी राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे ही शिखर संस्था (Apex Institute) म्हणून कार्यरत असेल.

१.३ जिल्हा स्तरावर प्रशिक्षणांचे स्वरुप, अपेक्षित प्रशिक्षणार्थींची संख्या इत्यादी तपशिल विचारात घेवून जिल्हा पंचायत संसाधन केंद्राच्या सहकार्याने प्रशिक्षण व क्षमता बांधणीचे काम पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील.

१.४ जिल्हा स्तरावरील व जिल्ह्यांतर्गत सर्व प्रशिक्षणासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) हे समन्वय अधिकारी म्हणून काम करतील. जिल्हा परिषद / पंचायत समिती सदस्य व अधिकारी यांच्या यशदा स्तरावरील प्रशिक्षणासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) हे समन्वय अधिकारी राहतील.

१.५ राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) यांचेशी सल्लामसलत करुन प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमांचे मोड्यूल, वाचन साहित्य, वेळापत्रक, सनियंत्रण आणि मूल्यमापन करण्याची जबाबदारी राज्य पंचायत संसाधन केंद्र व राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे यांची राहील.

१.६ जिल्हा स्तरावरील प्रशिक्षण कार्यक्रम व उपक्रमांचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व राज्य स्तरावर व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) यांची राहील.

१.७ राज्य पंचायत संसाधन केंद्र, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे आणि अभियानांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या विविध प्रशिक्षण संस्था यांचेमार्फत पुनर्रचित (Revamped) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत घेण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांचा आढावा व सनियंत्रण करण्याची जबाबदारी व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) यांची राहील.

## २) <u>संस्थात्मक संरचना- प्रशिक्षण</u>:-

### २.१ राज्य पंचायत संसाधन केंद्र (SPRC)

संदर्भ क्र. २ येथील दि.२०.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित असणारे राज्य पंचायत संसाधन केंद्र (SPRC) यापुढेही राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD), यशदा, पुणे यांच्या अधिनस्त कार्यरत राहील. सदर राज्य पंचायत संसाधन केंद्रासाठी मंजुर मनुष्यबळ, केंद्राची भुमिका, कर्तव्ये व जबाबदाऱ्या सोबतच्या <u>परिशिष्ट - १</u> नुसार राहतील.

### २.२ जिल्हा पंचायत संसाधन केंद्र (DPRC)

२.२.१ संदर्भ क्र. २ येथील दि.२०.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये नमुद केल्यानुसार जिल्हा पंचायत संसाधन केंद्र (DPRC) यापुढेही कार्यरत राहतील. सदर जिल्हा पंचायत संसाधन केंद्रासाठी मंजुर मनुष्यबळ, केंद्राची भुमिका, कर्तव्ये व जबाबदाऱ्या सोबतच्या <u>परिशिष्ट - २</u> नुसार राहतील.

२.२.२ राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत जिल्हा पंचायत संसाधन केंद्राच्या इमारत बांधकामासाठी प्रत्येकी रु. २.०० कोटी उपलब्ध करुन देण्याची तरतूद होती. सदर तरतूद रद्द करण्यात आली आहे. त्याऐवजी ज्या जिल्ह्यामध्ये जिल्हा पंचायत संसाधन केंद्रासाठी स्वतंत्र इमारत नाही, अशा जिल्ह्यांना जिल्हा पंचायत संसाधन केंद्रासाठी सर्व सुविधायुक्त इमारत भाड्याने घेता येईल, अशी तरतूद करण्यात येत आहे. त्यासाठी अभियानांतर्गत रु.२५/- प्रती स्क्वे. फूट (Rs. 25/- per Sq.ft built up area) प्रमाणे जास्तीत जास्त रु.५०,०००/- प्रती महिना याप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. अशाप्रकारचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी छाननी करुन राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायत राज यांचे मार्फत राज्य शासनाकडे मंजुरीस्तव सादर करावेत.

२.२.३ प्रत्येक केंद्रासाठी केंद्र शासनाकडून वार्षिक रुपये २०.०० लक्ष आवर्ती अनुदान वार्षिक आराखड्यातील मंजूरीनुसार उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### २.३ तालुका पंचायत संसाधन केंद्र (BPRC)

संदर्भ क्र. २ येथील दि.२०.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये नमुद केल्यानुसार तालुका पंचायत संसाधन केंद्र (BPRC) यापुढेही कार्यरत राहतील. सदर केंद्रांकरीता खालीलप्रमाणे तरतूद करण्यात येत आहे.

२.३.१ ज्या तालुक्यामध्ये तालुका पंचायत संसाधन केंद्रासाठी स्वतंत्र इमारत नाही, अशा तालुक्यांना, तालुका पंचायत संसाधन केंद्र स्थापन करुन कार्यान्वित करण्यासाठी सर्व सुविधायुक्त इमारत भाड्याने घेता येऊ शकेल. त्यासाठी अभियानांतर्गत रु. २०/- प्रती वर्ग फूट (Rs. 20/- per Sq.ft built up area) प्रमाणे जास्तीत जास्त रु. ३०,०००/- प्रती महिना याप्रमाणे निधी उपलब्ध करुन देता येईल. अशाप्रकारचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी छाननी करुन राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायत राज यांचेमार्फत राज्य शासनाकडे मंजुरीस्तव सादर करावेत.

२.३.२ प्रत्येक केंद्रासाठी केंद्र शासनाकडून वार्षिक रुपये ४.२० लक्ष आवर्ती अनुदान वार्षिक आराखड्यातील मंजूरीनुसार उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## ३. पंचायतराज संस्थांमध्ये माहिती व तंत्रज्ञानाद्वारे पारदर्शकता व उत्तरदायित्व

३.१ पंचायती राज मंत्रालय,भारत सरकार यांचे मार्फत विकसित करण्यात आलेल्या सर्व Panchayat Enterprise Suit (PES) आणि राज्य शासनाने स्वतंत्रपणे विकसित केलेली Software/Applications कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने राज्यामध्ये आजपर्यंत १९,९९७ आपले सरकार सेवा केंद्र सुरू केलेली आहेत.

३.२ जीपीएस, मोबाईलव्दारे संदेश इत्यादींच्या माध्यमातून पंचायतींच्या कामकाजाची ऑनलाईन पाहणी करण्याची पध्दत बसविणे, माहितीच्या व्यवस्थापनासाठी भौगोलिक माहिती प्रणालीचा (GIS) आणि Geo- tagging चा वापर करणे आवश्यक आहे, जेणेकरुन सर्व माहिती ही दृष्य व समजण्यास सुलभ अशा स्वरुपात लोक प्रतिनिधी, अधिकारी तसेच जनतेस उपलब्ध राहील. भौगोलिक माहिती प्रणालीच्या माध्यमातून माहितींच्या सुलभ सादरीकरणामुळे राज्य पातळीपासून ग्राम पातळीपर्यंत निर्णयप्रक्रिया सुलभ होऊ शकेल व विकासाचा निधी गरजांच्या प्राधान्यक्रमानुसार अधिक प्रभावीपणे वापरण्याबाबतच्या वित्त आयोगाच्या सूचनांची अंमलबजावणी होईल.

३.३ आपले सरकार सेवा केंद्रामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या सेवा आणि उपरोक्तप्रमाणे माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे अपेक्षित असणाऱ्या सेवा नियमितपणे व सुरळीतपणे सुरु ठेवण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील.

## ४.पेसा क्षेत्रासाठी विशेष सहाय्य:-

पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (पेसा), १९९६ अंतर्गत पेसा क्षेत्रातील गावांच्या ग्रामसभांना मोठ्या प्रमाणात विविध स्वरुपाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. या सर्व अधिकारांचा परिणामकारक, पारदर्शीपणे वापर करण्याच्या दृष्टिने ग्रामसभांना उपस्थिती वाढवून गावातील सर्व घटकांचा सक्रिय सहभाग निर्णयप्रक्रियेमध्ये होणे आवश्यक आहे. त्यासाठी या योजनेअंतर्गत पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींना खालीलप्रमाणे विशेष सहाय्य करण्यात येणार आहे.

४.१ पेसा क्षेत्रातील जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत सदस्यांसाठी स्वतंत्र क्षमता बांधणी व प्रशिक्षण कार्यक्रम.

४.२. पेसा क्षेत्रातील ग्रामसभा जनजागृती व बळकटीकरणासाठी ग्रामसभा दिशानिर्देशन (Gramsabha Orientation) उपक्रम राबविण्याबाबत राज्य शासनाकडील पत्र जावक क्र. पेसाअ-२०१७/प्र.क्र.१७/पं.रा-२, दि.२८ फेब्रुवारी, २०१७ अन्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या

आहेत. यासाठी ५ पेसा ग्रामपंचायतींच्या समुहासाठी वार्षिक रु. १५,०००/- प्रमाणे अभियानांतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानुसार पेसा जिल्ह्यांनी, त्यांचे जिल्ह्यातील ५ पेसा ग्रामपंचायतीचा एक समुह तयार करुन, त्याठिकाणी हाती घ्यावयाच्या उपक्रमांच्या तपशिलासह प्रस्ताव राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायत राज यांच्याकडे मंजुरीस्तव व निधी मागणीसाठी सादर करावेत.

४.३. पेसा क्षेत्रातील प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या ग्रामसभा मोबिलायझर यांना केंद्रशासनाने केलेल्या तरतूदीनुसार रु. २,५००/- मासिक मानधनाऐवजी रु.४,०००/- मासिक मानधन मंजूर केलेले आहे. त्यानुसार ग्रामसभा मोबिलायझर यांचे मानधन प्रती महिना रु. ४,०००/- प्रमाणे अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४.४ ग्रामसभा मोबिलायझर यांच्या नियुक्तीची कार्यपध्दती, त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या शासनाचे पत्र जावक क्र.रागांपं-२०१६/प्र.क्र.१०१/योजना-४, दिनांक २२ जून, २०१६ व २२ जानेवारी, २०१८ अन्वये निश्चित केलेल्या आहेत. त्यानुसार तालुका प्रशिक्षण समन्वयक (पेसा) यांनी ग्रामसभा मोबिलायझर यांच्या कामकाजावर देखरेख ठेऊन सनियंत्रण करावयाचे आहे.

४.५ पेसा क्षेत्रातील प्रत्येक तालुक्यासाठी एक याप्रमाणे राज्यात एकुण ५९ तालुका पेसा समन्वयक पदाचे पदनाम तालुका प्रशिक्षण समन्वयक (पेसा) असे करण्यात येत असून केंद्र शासनाच्या सूचनांनुसार सदर पदाचे मानधन प्रत्येकी प्रतिमहा रु.२५,०००/- प्रमाणे अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर पदे शासनाच्या विहीत नियमांनुसार बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यात यावीत.

४.६ पेसा क्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यासाठी एक याप्रमाणे राज्यात एकुण १३ जिल्हा पेसा समन्वयक पदाचे पदनाम जिल्हा प्रशिक्षण समन्वयक (पेसा) असे करण्यात येत असून केंद्रशासनाच्या सूचनांनुसार सदर पदाचे मानधन प्रत्येकी प्रतिमहा रु.३०,०००/- प्रमाणे अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर पदे शासनाच्या विहीत नियमांनुसार बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यात यावीत.

४.७ जिल्हा प्रशिक्षण समन्वयक (पेसा) व तालुका प्रशिक्षण समन्वयक (पेसा) यांची नियुक्ती पध्दती, कर्तव्ये व जबाबदाऱ्या शासन पत्र क्र.राग्रास्व-२०१७/प्र.क्र.१४७/योजना-४, दि. २२ जानेवारी, २०१८ नुसार राहतील.

४.८ जिल्हानिहाय जिल्हा प्रशिक्षण समन्वयक (पेसा) व तालुका प्रशिक्षण समन्वयक (पेसा) यांची मंजूर पदे व इतर तपशिल <u>परिशिष्ट- ३</u> प्रमाणे राहील.

४.९ पेसा क्षेत्रासाठी वरीलप्रमाणे देण्यात येणारे विशेष सहाय्य दरवर्षी केंद्र शासनाकडून वार्षिक आराखड्यामध्ये मंजूर करण्यात येणाऱ्या निकष व निधीनुसार सुरू राहील.

## ५. <u>नाविन्यपूर्ण उपक्रम</u>

अभियान राबविताना पंचायतीराज व्यवस्थेच्या बळकटीकरणाच्या अनुषंगाने जाणविणाऱ्या विविध समस्या, अडचणी, मर्यादा यावर उपाय योजण्याच्या दृष्टिने नाविन्यपूर्ण कल्पना, उपक्रम, प्रयोग, पध्दती, इत्यादींना सातत्याने जाणीवपूर्वक प्रोत्साहन देण्यात यावे. याकरिता तज्ञांच्या मदतीने पंचायती राज व्यवस्थेतील प्रमुख अडचणी/समस्या शोधून त्यावरील उपाययोजनांच्या संभाव्य पर्यायांबाबत विचार करण्यात यावा. तसेच अभियानातील विविध उपक्रम स्थानिक पातळीवर राबविताना पंचायती व त्यांच्या प्रशासकीय यंत्रणांना पारंपारिक पध्दतीऐवजी नाविन्यपूर्ण पध्दतींचा अवलंब करुन अशा पर्यायांचे प्रयोग/चाचणी करण्याकरिता प्रोत्साहन देण्यात यावे.

## ६. आर्थिक विकास व उत्पन्न वाढीचे प्रकल्प :-

पंचायत राज संस्थांना त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये आर्थिक विकासाचे व उत्पन्न वाढीचे लघु प्रकल्प हाती घेता येऊ शकतील. त्यासाठी अभियानांतर्गत स्वतंत्र प्रस्ताव राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायत राज यांच्यामार्फत शासनास सादर करावेत.

## ७. जनजागृती व लोकप्रबोधन :-

७.१ अभियानाच्या विविध उपक्रमांमध्ये जनतेचा व समाजातील विविध घटकांचा उत्स्फूर्त सहभाग मिळावा याकरिता प्रसार माध्यमांचा कल्पकतेने वापर करुन जनजागृती व लोकप्रबोधनाचा व्यापक प्रयत्न करण्यात यावा. यासाठी जिल्हा परिषद प्रभाग स्तरावर व तालुका स्तरावर एक दिवसीय शिबिरे, दूरदर्शन, रेडिओ, उपग्रह वाहिनी, व्हिडीओ, फिल्मस्, नाट्य व पथनाट्य, चित्रकला स्पर्धा व सचित्र मार्गदर्शिका, नियतकालिके, स्थानिक मेळावे, अभ्यास सहली, स्थायी व फिरती प्रदर्शने इत्यादी बहुविध माध्यमे व उपकरणे उपलब्ध करून परिस्थितीनुरुप वापर करण्यात यावा.

७.२ प्रत्येक जिल्हयाने स्थानिक परिस्थिती, संसाधने व गरज विचारात घेऊन त्यांच्या जिल्ह्याचा माहिती, प्रचार व प्रसिद्धीचा आराखडा तयार करुन तो राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) कडे सादर करावयाचा आहे.

७.३ राज्याचा एकत्रित माहिती, प्रचार व प्रसिध्दीसाठीचा वार्षिक आराखडा तयार करण्यात येवून त्यावर योजनेच्या एकूण वार्षिक आराखडयामधील मंजूर निधीच्या दोन टक्क्यांच्या मर्यादेत निधीचा विनियोग करण्यात यावा.

## ८. राज्य, जिल्हा व तालुका स्तरीय प्रकल्प व्यवस्थापन व मनुष्यबळ :-

**"पुनर्रचित (Revamped) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान"** ही योजना सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यात आलेली असून या योजनेच्या अंमलबजावणीसाठी यापूर्वीच्या **"राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान"** योजनेंतर्गत मंजुर मनुष्यबळाच्या पदनामामध्ये व त्याकरीता आवश्यक तरतूदीमध्ये, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन, खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

### ८.१ राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (SMU-PR)

दि. २०.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान योजनेचे पुनर्गठन करुन "राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान" लागू करण्यात आले आहे. सदर अभियानांतर्गत राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायत राज (SMU-PR) स्थापन करण्यात आला असून या कक्षाचे मनुष्यबळ, भुमिका, कर्तव्य व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशिल परिशिष्ट - ४ प्रमाणे राहील.

### ८.२ जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (DPMU)

दि. २०.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षासाठी मनुष्यबळ मंजूरी व त्यांच्या भूमिका, कर्तव्य व जबाबदाऱ्या या बाबतचा तपशिल परिशिष्ट - ५ नुसार राहील.

### ८.३ तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (BPMU)

८.३.१ महाराष्ट्र राज्यातील सर्व ३५१ तालुक्यांमध्ये जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षाच्या अखत्यारीत तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्ष गठित केले जातील. या कक्षासाठी तालुका प्रकल्प समन्वयक म्हणून गट विकास अधिकारी हे कामकाज पाहतील. तसेच पंचायत समितीमधील सहाय्यक गट विकास अधिकारी हे सहाय्यक प्रकल्प समन्वयक म्हणून कामकाज पाहतील.

८.३.२ तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील पदांचा तपशिल आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या परिशिष्ट - ६ प्रमाणे राहतील.

८.३.३ तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे कार्यालय स्थापन करण्यासाठी जागेची व्यवस्था संबधित पंचायत समितीने करावी. तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्ष संबंधित गट विकास अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद यांच्या नियंत्रणाखाली राहील.

## ९. अभियान - सनियंत्रण व मुल्यमापन

अभियानांतर्गत विविध उपक्रमांचा नियमितपणे आढावा घेऊन सनियंत्रण व मुल्यमापनासाठी खालील समित्या रहातील.

### ९.१ दिशादर्शक समिती

अभियानाच्या प्रगतीसंदर्भात अपेक्षित फलनिष्पत्तीच्या दृष्टीने नियंत्रण ठेवण्याकरिता तसेच पंचायती राज व्यवस्थेकडे विविध विषय, कर्मचारी व निधीचे हस्तांतरण करण्यासाठी धोरणात्मक निर्णयासाठी मा.मंत्री, ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखालील दिशादर्शक समिती परिशिष्ट - ७ प्रमाणे राहील.

### ९.२ सुकाणू समिती

निधीचे हस्तांतरण आणि राज्य शासनाच्या विविध विभागांचा समन्वय साधण्याच्या दृष्टीने मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती परिशिष्ट - ८ प्रमाणे राहील.

### ९.३ राज्य कार्यकारी समिती

अभियानाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या सर्व बाबींचे सनियंत्रण करण्याकरिता मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतीराज यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समिती परिशिष्ट - ९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील. राज्य कार्यकारी समिती अभियानाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या सर्व बाबींचे सनियंत्रण करेल. अभियान अंमलबजावणी विषयाचे सर्व अधिकार या समितीस राहतील.

९.४ जिल्हा सनियंत्रण समिती

जिल्ह्यातील अभियानाची अंमलबजावणी, सनियंत्रण व मुल्यमापन करण्यासाठी जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा सनियंत्रण समिती परिशिष्ट -१० प्रमाणे राहील.

## १०. फलनिष्पत्तीवर आधारित मुल्यमापन

१०.१ अभियानाच्या अपेक्षित फलनिष्पत्तीचे निर्देशक (**Indicators**) ठरविण्यात येतील. या निर्देशकाच्या आधारे अभियानाच्या सनियंत्रणासाठी ऑनलाईन स्वरुपाची एकात्मिक माहिती व्यवस्थापन प्रणाली (**Integrated MIS**) विकसित करण्यात येईल. जेणेकरुन अभियानाच्या सर्वंकष प्रगतीचा एकत्रित आढावा घेणे शक्य होईल.

१०.२ प्रतिवर्षी अभियानाच्या फलनिष्पत्तीचे मूल्यमापन (**Evaluation**) त्रयस्थ संस्थांमार्फत करण्यात येईल. अशा प्रकारचे प्रतिवर्षी मूल्यमापन करणाऱ्या त्रयस्थ संस्थांची सूची ५ वर्षांसाठी राज्य कार्यकारी समिती निश्चित करेल.

१०.३ एकात्मिक सनियंत्रण तसेच त्रयस्थ मूल्यमापनाच्याआधारे अभियानाच्या अंमलबजावणी मध्ये आवश्यक सुधारणांचा नियमित आढावा घेवून सुधारित पध्दती (**Mid-Course Corrections)** वेळोवेळी राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज **(SMU-PR)** कडून लागू करण्यात येईल.

## ११. निधी-स्त्रोत व्यवस्थापन

११.१ प्रस्तुत योजना ही केंद्र पुरस्कृत असून, या योजनेसाठी केंद्र व राज्य हिस्सा अनुक्रमे ६०% : ४०% असा आहे. या अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी व त्यामर्यादेत राज्य हिस्सा उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर निधी योजनेंतर्गत उघडण्यात आलेल्या **Single Nodal Account- SNA** मध्ये वर्ग करण्यात यावा.

११.२ योजनेअंतर्गत उपलब्ध झालेल्या निधीतून राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) यांनी आवश्यकतेनुसार राज्य ग्रामीण विकास संस्था (यशदा), जिल्हा परिषदा, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, पंचायत राज प्रशिक्षण केंद्र व संयुक्त प्रशिक्षण केंद्र यांना PFMS मार्फत निधी आहरण मर्यादा निश्चित करून द्यावी. सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी त्यांना मंजुर असलेल्या उपक्रमांवर, त्यांना मंजुर केलेल्या निधी आहरण मर्यादेमधुन PFMS प्रणालीमार्फतच खर्च करावयाचा आहे.

११.३ जिल्हा परिषद स्तरावर राष्ट्रीयकृत बँकेमध्ये उघडण्यात आलेल्या Zero Balance Subsidiary Account मधून PFMS प्रणालीमार्फत खर्च करावयाचा आहे.

११.४ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अभियानाअंतर्गत विविध उपक्रमासाठी राज्य शासनाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार खर्च करावयाचा आहे. अभियानांतर्गत निधीच्या हिशोबाचा ताळमेळ, स्वतंत्र लेखे, अभिलेखे जतन करणे तसेच दैनंदिन कामकाजाची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांची राहील.

११.५ राज्य हिश्श्याचा निधी राज्य स्तरावरुन उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच अनुसूचित क्षेत्रातील उपक्रमांसाठी आदिवासी विकास विभागाकडून राज्य हिश्श्याचा निधी उपलब्ध करुन घेण्यात येईल.

११.६ अभियानांतर्गत निधीच्या हिशोबाचा ताळमेळ, स्वतंत्र लेखे, अभिलेखे जतन करणे तसेच दैनंदिन कामकाज यांची जबाबदारी राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) ची राहील.

## १२. लेखापरिक्षण व उपयोगिता प्रमाणपत्रे

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासन, राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) यांचेकडून योजनेअंतर्गत उपलब्ध झालेल्या निधीच्या विनियोगाचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे स्वाक्षरीने राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) मार्फत शासनास सादर करणे बंधनकारक राहील. तसेच महालेखापाल यांचे कार्यालयाकडून लेखापरिक्षण व सनदी लेखापाल यांचेमार्फत वार्षिक लेखा परिक्षण करून घेवून त्याचा अहवाल राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) मार्फत शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

१३. योजनेअंतर्गत राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर मंजूर असलेली परिशिष्टामधील नमूद पदे, पदनिहाय अर्हता विचारात घेऊन शासनाच्या पुर्वमान्यतेने विहीत नियमांचे पालन करुन प्रतिनियुक्ती / बाह्ययंत्रणेद्वारे राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) मार्फत भरण्यात येतील.

१४. केंद्र शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार, पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानबाबतचे सर्व निर्णय व त्यांच्या अंमलबजावणीसाठीची कार्यपध्दती निश्चित करण्यास ग्राम विकास विभाग सक्षम असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०९१६१२४७०२९०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJESH KUMAR

Digitally signed by RAJESH KUMAR
DN: c=IN, o=ALL INDIA SERVICES, ou=Rural Devlopment, postalCode=400001, st=MAHARASHTRA, 2.5.4.20=1e08bc9f719f8ce54a66aed8ed2a521ee2d571facec17b204b286a31e88c58d9, pseudonym=4C68155B8922364B2EBB0896AD34147E9F304749, serialNumber=65054D119A082276260F8A89874FD83D0D6D6A635CF1AEF6E1C9B580CAACC3B0, cn=RAJESH KUMAR
Date: 2022.09.23 18:24:08 +05'30'

**(राजेश कुमार)**
**अपर मुख्य सचिव**
**ग्राम विकास विभाग**

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
४. मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,

५. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,
६. मा.विधान सभा/ मा.विधान परिषद सदस्य (सर्व),
७. मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व),
८. मा.अप्पर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक,
९. मा.प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक,
१०. मा.प्रधान सचिव (जलसंधारण) यांचे स्वायी सहायक,
११. मा.प्रधान सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक,
१२. मा.प्रधान सचिव (आदिवासी विकास) यांचे स्वीय सहायक,
१३. मा.प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान) यांचे स्वीय सहायक,
१४. मा.प्रधान सचिव (महिला व बाल विकास) यांचे स्वीय सहायक,
१५. मा.सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे स्वीय सहायक,
१६. विभागीय आयुक्त (सर्व)
१७. महा संचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), बाणेर रोड, पुणे,
१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
१९. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे.
२०. वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प-१७) मंत्रालय, मुंबई-३२,
२१. नियोजन विभाग (का.क्र.१४४४), मंत्रालय, मुंबई-३२,
२२. सह सचिव /उप सचिव (सर्व), (ग्राम विकास विभाग) बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४००००१,
२३. निवडनस्ती-आस्था - १५ (योजना-४).

## परिशिष्ट - १

## राज्य पंचायत संसाधन केंद्र (SPRC)

### अ. भूमिका, कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-

राज्यामध्ये पंचायतराज व्यवस्थेबाबत माहिती व ज्ञान विकसित करून त्याचा प्रसार करण्यासाठी आणि पंचायतराज संस्थांच्या क्षमता बांधणीस अधिक वेग देण्यासाठी राज्य पंचायत संसाधन केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. सदर राज्य पंचायत संसाधन केंद्र (SPRC) राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD), यशदा, पुणे यांच्या अधिनस्त कार्यरत राहील. त्याचप्रमाणे राज्य पंचायत संसाधन केंद्र, राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागासाठी (पंचायतराज) विचार गट (Think Tank) म्हणूनही कार्य करेल. राज्य पंचायत संसाधन केंद्राची कर्तव्ये व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतील.

१. पंचायतींच्या क्षमताबांधणी विषयी धोरण तयार करणे.
२. प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण करून, आवश्यक प्रशिक्षण मोड्यूल्स व प्रशिक्षण साहित्य विकसित करणे.
३. जिल्हा व तालुका संसाधन केंद्रांना विकेंद्रीत पातळीवरील प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक ते सहाय्य करणे.
४. पंचायत लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणासाठी प्रविण प्रशिक्षक व संसाधन व्यक्ती विकसित करणे.
५. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, महिला बालकल्याण, कृषी इ. विषयांच्या प्रशिक्षणासाठी विशेष (Specialist) संस्थांशी संपर्क व सहकार्य स्थापन करणे.
६. स्वयंसेवी संस्था व इतर संसाधन संस्थांचे अनुभव सामायिकरण (Experience Sharing), परस्पर शिक्षण व शैक्षणिक साहित्याची देवाणघेवाण करण्यासाठी जाळे निर्माण करणे.
७. पंचायतराज, विकेंद्रीकृत नियोजन, विकेंद्रीकृत विकास व इतर वेळोवेळी निर्माण होणाऱ्या स्थानिक गरजांविषयी प्रशिक्षण, सेमिनार, कॉन्फरन्सेस, कार्यशाळा घेणे.
८. पंचायतराज, विकेंद्रीकृत विकास आणि इतर संबंधित समकालीन विषयांबाबत संशोधनास प्रोत्साहन देणे आणि संशोधन करणे.
९. पंचायतराज संस्थांच्या प्रश्नांचे विश्लेषण करणे व उपाय योजनांबाबत धोरण तयार करणे.
१०. ग्रामीण भागातील नियोजन प्रक्रिया सुलभ करण्यासाठी विकासाच्या विविध पैलूबाबत आवश्यक माहिती, डेटाबेस तयार करून संसाधन केंद्र म्हणून कार्य करणे.
११. पंचायतराज व विकेंद्रीकृत विकासासंबंधी विविध विषयांबाबत पुस्तके, नियतकालिके, लेख तयार करून विविध माध्यमांद्वारे प्रसिध्द करणे.
१२. राज्यातील पंचायतराज संस्थांच्या विविध पैलूंबाबत मुल्यमापन व संनियंत्रण करणे किंवा त्यासाठी मार्गदर्शन करणे.
१३. राज्य पंचायत संसाधन केंद्रामार्फत (SPRC) घेण्यात येणाऱ्या सर्व प्रशिक्षण कार्यक्रमांचे भौतिक व आर्थिक अहवाल राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) व शासनास सादर करावेत. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत राज्य पंचायत संसाधन केंद्र (SPRC) साठी राज्य ग्रामीण विकास संस्थेला (SIRD) उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीचा विनियोग

स्वतंत्र बँक खात्यामार्फत करण्यात यावा. तसेच खर्च व खर्चाचा ताळमेळ घेणे, स्वतंत्र लेखे ठेवणे, अभिलेखे जतन करणे इ. जबाबदारी राज्य ग्रामीण विकास संस्थेची (SIRD) राहील.

१४. राज्य ग्रामीण विकास संस्थेला (SIRD) घेण्यात येणाऱ्या सर्व प्रशिक्षण कार्यक्रमांचे भौतिक व आर्थिक अहवाल राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) व शासनास सादर करावेत. राज्य ग्रामीण विकास संस्थेला (SIRD) पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीचा हिशेब, लेखापरिक्षण व उपयोगिता प्रमाणपत्र राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) व शासनास सादर करणे.

१५. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत विविध उपक्रमांची जबाबदारी प्रभावीपणे , विहित मुदतीत व समन्वयाने पार पाडण्याच्या दृष्टीने राज्य ग्रामीण विकास संस्था (SIRD), राज्य पंचायत संसाधन केंद्र (SPRC) व राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) हे जबाबदार राहतील.

**ब. मनुष्यबळ**

१. राज्य पंचायत संसाधन केंद्रामध्ये साधारणत: खालील सहा विषयाच्या तज्ञ व्यक्ती असतील.

१.१ पंचायतराज, विकेंद्रीकृत नियोजन, सुक्ष्म नियोजन इ.

१.२ महिला सक्षमीकरण, लिंगभेद समस्या/मुद्दे (Gender Issues) आणि सामाजिक न्याय

१.३ ई-गव्हर्नन्स, PES, लेखा व अंदाजपत्रक इ.

१.४ ग्रामविकास, कौशल्यवृध्दी, उपजिवीका इ. क्षेत्रे

१.५ शिक्षण, आरोग्य, स्वच्छता इ. सामाजिक क्षेत्रे

१.६ शाश्वत विकासाची ध्येये

२. आवर्ती खर्चासाठी राज्य पंचायत संसाधन केंद्रास वार्षिक आराखड्यातील मंजूरीनुसार प्रती वर्ष रू.८४.०० लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात येईल. त्यानुसार राज्य पंचायत संसाधन केंद्रासाठी खालीलप्रमाणे आवश्यक मनुष्यबळाची निवड व नियुक्ती करार पध्दतीने राज्य ग्रामीण विकास संस्थेमार्फत करण्यात यावी.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | वार्षिक मानधन मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | उपसंचालक | ३ | २४ ते २६ लक्ष |
| २ | विषय तज्ञ (Thematic expert) | ६ | ३३ ते ३५ लक्ष |
| ३ | डाटा एंट्री ऑपरेटर / सहाय्यक | ६ | १८ ते २० लक्ष |
| एकुण | | १५ | ७५ ते ८१ लक्ष |

३. राज्य पंचायत संसाधन केंद्रामधील मनुष्यबळ संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाचे कामकाज पाहील.

४. मनुष्यबळाअभावी पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाचे उपक्रम अंमलबजावणीमध्ये विलंब होऊ नये याकरीता उपाययोजना करण्याची दक्षता राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे यांनी घ्यावी.

*************

## परिशिष्ट - २
## जिल्हा पंचायत संसाधन केंद्र (DPRC)

अ. भूमिका, कर्तव्ये व जबाबदाऱ्या

१. जिल्हा पंचायत संसाधन केंद्राचे कामकाज संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली राहील.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) हे या केंद्रांचे पदसिध्द प्राचार्य म्हणून कामकाज पाहतील.
३. जिल्हास्तरावरील विविध प्रकारच्या क्षमताबांधणी व प्रशिक्षण कार्यक्रमांचे मंजूर आराखड्यानुसार नियोजन करणे.
४. जिल्ह्यातील प्रशिक्षण उपक्रमांचे संबंधित ग्रामसेवक प्रशिक्षण केद्र, पंचायतराज प्रशिक्षण केंद्र, जिल्ह्यातील प्रशिक्षणाची सोय असलेली महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था इ. समवेत समन्वय साधून वार्षिक वेळापत्रक तयार करणे.
५. या प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी राज्य पंचायत संसाधन केंद्र / राज्य ग्रामीण विकास संस्था यांचेकडून प्रशिक्षणाचे मोड्यूल, वेळापत्रक, प्रशिक्षण साहित्य, प्रविण प्रशिक्षकांच्या याद्या इ. प्राप्त करून घेणे.
६. विविध प्रशिक्षण उपक्रमांसाठी आवश्यक तेवढ्या प्रविण प्रशिक्षक / साधन व्यक्तींची निवड करून त्यांना प्रशिक्षणासाठी राज्य ग्रामीण विकास संस्थेकडे पाठविणे.
७. जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षामधील लेखापाल, लिपिक तसेच पेसा जिल्ह्यांमधील जिल्हा प्रशिक्षण समन्वयक (पेसा) यांचेवरही आवश्यकतेनुसार जिल्हा पंचायत संसाधन केंद्रातील कामकाजाची जबाबदारी सोपविणे.
८. प्रशिक्षणासाठी आवश्यक तेवढे प्रशिक्षणार्थी उपस्थित ठेवणे.
९. प्रशिक्षण कार्यपध्दतींमध्ये नाविण्यपूर्ण प्रयोग करून प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढविणे.
१०. जिल्ह्यातील स्थानिक परिस्थिती, संसाधन, आवश्यकता व गरज विचारात घेवून जिल्ह्याचा माहिती, प्रचार व प्रसिध्दीचा आराखडा तयार करणे.
११. ग्रामीण भागातील नियोजन प्रक्रिया सुलभ करण्यासाठी विकासाच्या विविध पैलूंबाबत आवश्यक माहिती, डेटाबेस तयार करून जिल्ह्याचे संसाधन केंद्र म्हणून कार्य करणे.
१२. पंचायत लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणासाठी व पंचायतराज संस्थांच्या विकेंद्रीकृत नियोजनासाठी विविध विषयांची हाताळणी (Hand Holding) करणे.
१३. सर्व प्रशिक्षण कार्यक्रमांचे भौतिक व आर्थिक अहवाल, लेखापरिक्षण व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे.

## ब. मनुष्यबळ

| अ. क्र. | पदांचे नांव | नियुक्तीचा प्रकार | पद संख्या | वेतनश्रेणी मर्यादा (रुपये) | अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्राचार्य | पदसिध्द | १ | - | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | |
| २. | प्रशिक्षण व्यवस्थापक प्रत्येकी १ पद | बाह्ययंत्रणे द्वारे/सेवा निवृत्त | २८ | प्रत्येकी रु.४०,०००/- दरमहा | पदव्युत्तर पदवी/ नामांकित संस्थेचा M.A. (समाजशास्त्र)/ M.B.A./M.S.W (समाजकार्य /ग्रामीण व्यवस्थापन/ जनरल मॅनेजमेंट) | ३ वर्षाचा अनुभव.<br>(अ) एकूण अनुभवापैकी ToT आणि प्रशिक्षण आयोजनाचा किमान २ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>(ब) संगणकाचे ज्ञान आवश्यक (MS-CIT).<br>(क) संशोधन, पृथ:करण आणि दस्तऐवज करण्याचा अनुभव.<br>(ड)ग्राम विकास/ पंचायती राज बाबीं संबंधी ज्ञान. |
| | | | | | सेवानिवृत्त अधिकाऱ्यांसाठी वरील अर्हता व अनुभवाऐवजी गट-ब पेक्षा कमी नसलेल्या पदावरून सेवा निवृत्त झालेला असावा व त्यास ग्राम विकास/ पंचायती राज बाबींसंबंधी ज्ञान आवश्यक. | |
| ३. | सत्र व्यवस्थापक प्रत्येकी २ पदे | बाह्ययंत्रणे द्वारे/सेवा निवृत्त | ५६ | प्रत्येकी रु. २५,०००/- दरमहा | नामांकित संस्थेचा कोणत्याही शाखेचा पदवीधर | ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>(अ) संगणक विषयक अर्हता परिक्षा (MS-CIT) प्राप्त असणे आवश्यक.<br>(ब) मराठी व इंग्रजीतून टिप्पणी लेखन व टंकलेखन ज्ञान असणाऱ्यास प्राधान्य. |
| | | | | | सेवानिवृत्त अधिकाऱ्यांसाठी वरील अर्हता व अनुभवाऐवजी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांसाठी विस्तार अधिकारी किंवा समकक्ष पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा व मराठी व इंग्रजीतून टिप्पणी लेखन व टंकलेखन ज्ञान. | |
| ४. | सहाय्यक | बाह्ययंत्रणे द्वारे | २८ | प्रत्येकी रु. १५,०००/- दरमहा | बारावी (H.S.C.) उत्तीर्ण | ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>(अ)संगणक विषयक अर्हता परिक्षा (MS-CIT) प्राप्त असणे आवश्यक.<br>(ब)शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परिक्षा (GCC-TBC) - इंग्रजी व मराठी परिक्षा उत्तीर्ण |
| | एकूण | | ११२ | | | |

"पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाअंतर्गत" केंद्र शासनाकडून प्रत्येक जिल्हा पंचायत संसाधन केंद्रासाठी (DPRC) वार्षिक रु. २०.०० लक्ष निधी आवर्ती खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या निधीमधून मनुष्यबळ व इतर आवर्ती खर्च भागविण्यात यावा.

********************

## परिशिष्ट - ३

### पेसा मनुष्यबळ

१. पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींना विशेष सहाय्य म्हणून अभियानांतर्गत खालील कंत्राटी पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | स्तर | पदनाम | पदसंख्या | मानधन (रूपये) |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा | जिल्हा प्रशिक्षण समन्वयक (पेसा) | १३ (प्रत्येक पेसा जिल्ह्यासाठी एक) | मोबाईल भत्ता व प्रवास भत्ता सह एकूण रू. ३०,०००/- प्रती महिना |
| २ | तालुका | तालुका प्रशिक्षण समन्वयक (पेसा) | ५९ (प्रत्येक पेसा तालुक्यासाठी एक) | मोबाईल भत्ता व प्रवास भत्ता सह एकूण रू. २५,०००/- प्रती महिना |

२. केंद्र शासनाने विहित केलेले आर्थिक निकष विचारात घेता जिल्हा प्रशिक्षण समन्वयक (पेसा) यांना मासिक एकत्रित रू. ३०,०००/- व तालुका प्रशिक्षण समन्वयक (पेसा) यांना मासिक एकत्रित रू.२५,०००/-मानधन अदा करावयाचे असून या एकत्रित मानधनामध्ये अनुक्रमे जिल्हा व तालुका अंतर्गत केलेल्या प्रवासाचे प्रवासभत्ता व मोबाईल भत्त्याचा समावेश राहील.

३. शासन निर्णयाप्रमाणे जिल्हा व तालुका प्रशिक्षण समन्वयकांची नियुक्ती बाह्ययंत्रणेमार्फत करावयाची आहे.

४. ही सर्व बाह्ययंत्रणेमार्फत भरावयाची पदे, केंद्र शासनाकडून दरवर्षी मंजूर होणाऱ्या वार्षिक आराखड्यातील तरतूदी व निकषानुसार आणि कंत्राटामध्ये नमूद केलेल्या कालावधीसाठी कार्यरत राहतील.

********************

## परिशिष्ट - ४

## राज्य व्यवस्थापन कक्ष-पंचायत राज (SMU-PR)

### अ. भूमिका, कर्तव्ये व जबाबदाऱ्या

राज्यस्तरावर स्थापन करण्यात आलेल्या राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) या कक्षाकडे केंद्र व राज्य शासनाच्या ग्राम विकास व पंचायतीराज विभागाच्या विविध योजना / अभियानांची जबाबदारी राहणार आहे. या कक्षाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतील.

१. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाचे वार्षिक आराखडे तयार करणे.
२. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेची अंमलबजावणी करणे.
३. पंचायतींना सामाजिक अभिसरण (**Social Mobilization**), लेखा विषयक बाबी, ई-पंचायत, सनियंत्रणासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक सहाय्य करणे.
४. योजनेच्या भौतिक व आर्थिक प्रगतीचे सनियंत्रण करणे आणि योजनेअंतर्गत निश्चित केलेल्या MIS नुसार नियमितपणे केंद्र व राज्य शासनास अहवाल सादर करणे.
५. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचे राज्य ग्रामीण विकास संस्था / राज्य पंचायत संसाधन संस्था, जिल्हा परिषदा, ग्रामसेवक प्रशिक्षण संस्था, पंचायतराज प्रशिक्षण संस्था व इतर प्रशिक्षण संस्थांना निधी उपलब्ध करुन देणे.
६. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत प्राप्त झालेल्या निधीचे हिशेब ठेवणे, लेखापरिक्षण करून घेणे, राज्य ग्रामीण विकास संस्था / राज्य पंचायत संसाधन संस्था व जिल्हा परिषदा यांचेकडून लेखापरिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेवर प्राप्त करून घेवून केंद्र व राज्य शासनास सादर करणे.
७. केंद्र व राज्य शासनाशी समन्वय ठेवून मंजूर वार्षिक आराखड्यानुसार निधी प्राप्त करून घेणे.
८. राज्य ग्रामीण विकास संस्था / राज्य पंचायत संसाधन संस्था, जिल्हा व तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, जिल्हा व तालुका पंचायत संसाधन संस्था यांचे कामकाजामध्ये समन्वय साधून योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.
९. राज्य शासनाकडून वेळोवेळी सोपविण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणी करणे.
१०. या कक्षासाठी येणारा खर्च पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या १.५% प्रकल्प व्यवस्थापन निधीतून करावा.

**ब. मनुष्यबळ** (राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायत राज)

१) राज्य व्यवस्थापन कक्षाकरीता प्रतिनियुक्तीने भरावयाची १८ पदे व बाह्ययंत्रणेद्वारे भरावयाची १३ पदे अशी एकुण ३१ पदे खालीलप्रमाणे कार्यरत राहतील.

| अ. प्रतिनियुक्तीने भरावयाची पदे | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | पदांचा तपशिल | | | शेरा |
| | पदाचे नाव | वेतनश्रेणी | पद संख्या | |
| १ | संचालक | S-२७ | १ | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (निवडश्रेणी) या दर्जाचे अधिकारी |
| २ | अतिरिक्त संचालक | S-२५ | १ | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी या दर्जाचे अधिकारी |
| ३ | उप संचालक | S-२३ | १ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी या दर्जाचे अधिकारी |
| ४ | लेखाधिकारी | S-१६ | १ | महाराष्ट्र लेखा व वित्त सेवा संवर्गातीलवर्ग २ दर्जाचे अधिकारी |
| ५ | संगणक अभियंता/ शाखा अभियंता | S-१५ | १ | जि.प.कर्मचारी / अधिकारी |
| ६ | वरिष्ठ सहाय्यक/ समन्वयक | S-१४ | ४ | जि.प.कर्मचारी / अधिकारी |
| ७ | सांख्यिकी अधिकारी / विस्तार अधिकारी | S-१३ | २ | जि.प.कर्मचारी / अधिकारी |
| ८ | सहाय्यक लेखाधिकारी | S-८ | १ | जि.प.कर्मचारी / अधिकारी |
| ९ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | S-८ | १ | जि.प.कर्मचारी / अधिकारी |
| १० | कनिष्ठ सहाय्यक | S-६ | ४ | जि.प.कर्मचारी / अधिकारी |
| ११ | लघुलेखक | S-१४ | १ | जि.प.कर्मचारी / अधिकारी |
| | **एकूण** | | १८ | |

सदरची पदे भरण्याबाबत स्वतंत्रपणे सूचना निर्गमित करण्यात येतील.

पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षासाठी
(बाह्ययंत्रणेद्वारे भरावयाची पदे)

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | वार्षिक मानधन मर्यादा (रु.लक्ष) | मानधनाचा स्त्रोत |
|---|---|---|---|---|
| १ | विभागीय समन्वयक | २ | १४.४० ( प्रत्येकी रु. ७.२० लक्ष) | प्रकल्प व्यवस्थापन १.५% निधी |
| २ | प्रशिक्षण समन्वयक | १ | ७.२० | प्रकल्प व्यवस्थापन १.५% निधी |
| ३ | माहिती, शिक्षण व संवाद समन्वयक | १ | ७.२० | प्रकल्प व्यवस्थापन १.५% निधी |
| ४ | ग्रा.पं./प.सं./जि.प. विकास आराखडा समन्वयक | १ | ६.०० | प्रकल्प व्यवस्थापन १.५% निधी |
| ५ | शाश्वत विकासाची ध्येये स्थानिकिकरण समन्वयक | १ | ६.०० | प्रकल्प व्यवस्थापन १.५% निधी |
| ६ | लेखा समन्वयक | १ | ४.०० | प्रकल्प व्यवस्थापन १.५% निधी |
| ७ | आस्थापना समन्वयक | १ | ४.०० | प्रकल्प व्यवस्थापन १.५% निधी |
| ८ | प्रशासन समन्वयक | १ | ४.०० | प्रकल्प व्यवस्थापन १.५% निधी |
| ९ | परिचर | ४ | १०.०० | प्रकल्प व्यवस्थापन १.५% निधी |
| **एकूण** | | १३ | ६२.८० | |

२) राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षामध्ये कार्यरत असलेल्या वरील सर्व पदांचा खर्च प्रकल्प व्यवस्थापनासाठी मंजुर १.५ टक्के निधीतून भागविण्यात यावा.

३) याशिवाय राज्य व्यवस्थापन कक्षासाठी मनुष्यबळाकरीता केंद्र शासनाकडून स्वतंत्रपणे उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या रु. २६.४० लक्ष इतक्या निधीच्या मर्यादेत खालील पदे बाह्ययंत्रणेद्वारे कार्यरत राहतील.

| अ.क्र. | पदाचे नाव | वार्षिक मानधन मर्यादा(रु.लक्ष) |
|---|---|---|
| १ | राज्य प्रकल्प व्यवस्थापक | ८.०० |
| २ | राज्य समन्वयक (सनियंत्रण व मुल्यमापन) तथा वित्तीय सल्लागार | ७.४० |
| ३ | सांख्यिकिय विश्लेषक | ५.५० |
| ४ | तांत्रिक समन्वयक | ५.५० |
| **एकुण** | | २६.४० |

**************

## परिशिष्ट - ५

## जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (DPMU)

### अ. भूमिका, कर्तव्ये व जबाबदाऱ्या

राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) मार्फत राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (DPMU) स्थापन करण्यात येत आहे. या कक्षाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतील.

१. जिल्ह्यामध्ये पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांनुसार करणे.
२. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत जिल्ह्यासाठी मंजूर करण्यात आलेले विविध क्षमताबांधणी, प्रशिक्षणाचे व इतर उपक्रमांचे नियोजन करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे.
३. जिल्ह्यांतर्गत व जिल्हा स्तरावरील सर्व प्रकारच्या प्रशिक्षणांचे आयोजन करून त्यासाठी जिल्ह्यामध्ये उपलब्ध असणारी सर्व संसाधने, प्रविण प्रशिक्षक, संसाधन व्यक्ती, विविध प्रशिक्षण संस्था यांचा सुयोग्य व प्रभावीपणे वापर करणे.
४. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत जिल्ह्यास प्राप्त झालेल्या निधीमधून आवश्यकता व मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित गट विकास अधिकारी, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, पंचायतराज प्रशिक्षण केंद्र व प्रशिक्षण संस्थांना निधी वितरीत करणे.
५. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत मंजूर उपक्रमासाठी वितरीत केलेल्या निधीचे हिशेब घेवून त्याचे लेखापरिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांकडून प्राप्त करून घेणे.
६. जिल्ह्यातील मंजूर सर्व उपक्रमांची अंमलबजावणी करून नियमितपणे आढावा घेवून सनियंत्रण करणे.
७. जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे.
८. जिल्हा स्तरावर कार्यरत असलेले जिल्हा पंचायत संसाधन केंद्र, ई-जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष व पेसा कर्मचारी यांच्या कामकाजामध्ये समन्वय साधून यासाठी उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा एकत्रितरित्या पुरेपुर वापर करणे.
९. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत उपलब्ध निधीचे स्वतंत्र हिशेब, लेखे ठेवणे, जिल्हास्तरावर लेखापरिक्षण करून घेणे, जिल्ह्याचे एकत्रित उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे.
१०. विहित केलेले सर्व भौतिक व आर्थिक अहवाल राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) या कार्यालयाकडे नियमित सादर करणे.
११. प्रशिक्षण उपक्रमांशिवाय राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत मंजूर असलेल्या इतर उपक्रमांची अंमलबजावणी व सनियंत्रण करणे.
१२. केंद्र शासनाने विकसित केलेल्या विविध संगणक प्रणालींचा परिणामकारक वापर करून त्यामध्ये माहिती वेळोवेळी अद्ययावत करणे.
१३. राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) ने सोपविलेल्या इतर बाबींची अंमलबजावणी व सनियंत्रण करणे.

<u>ब. मनुष्यबळ</u>

| अ. क्र. | पदाचे नाव | नियुक्तीचे स्वरूप | पद संख्या | वार्षिक मानधन (रू.लक्ष) | मानधनाचा स्त्रोत |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा प्रकल्प समन्वयक | पदसिध्द | - | - | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) |
| २ | सहाय्यक जिल्हा प्रकल्प समन्वयक | पदसिध्द | - | - | सहाय्यक गट विकास अधिकारी (पंचायत) |
| ३ | जिल्हा व्यवस्थापक | बाह्ययंत्रणेद्वारे | ३४ | ४.५० प्रत्येकी | अभियनांतर्गत तरतुद |
| ४ | लेखापाल तथा सनियंत्रण व मूल्यमापन समन्वयक | बाह्ययंत्रणेद्वारे | ३४ | ३.५० प्रत्येकी | अभियनांतर्गत तरतुद |
| ५ | लिपीक तथा डाटा इंट्री ऑपरेटर | बाह्ययंत्रणेद्वारे | ३४ | २.८० प्रत्येकी | अभियनांतर्गत तरतुद |
| | **एकूण** | | १०२ | १०.८० | |

जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकरीता केंद्र शासनाकडून जिल्हानिहाय रु.१०.८० लक्ष इतका निधी प्रती वर्ष उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यामधून उपरोक्त पदांचा खर्च भागविण्यात यावा.

**************

## परिशिष्ट - ६

## तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (BPMU)

### अ. भूमिका, कर्तव्ये व जबाबदाऱ्या

राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) मार्फत पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक तालुक्यासाठी एक तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (BPMU) स्थापन करण्यात येत आहे. या कक्षाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतील.

१. तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (BPMU) तालुक्याचे गट विकास अधिकारी यांच्या अधिपत्याखाली कार्यरत राहील.
२. तालुक्यामध्ये पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांनुसार करणे.
३. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत तालुक्यासाठी मंजूर करण्यात आलेले विविध क्षमताबांधणी, प्रशिक्षणाचे व इतर उपक्रमांचे नियोजन करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे.
४. तालुक्यांतर्गत व तालुका स्तरावरील सर्व प्रकारच्या प्रशिक्षणांचे आयोजन करून त्यासाठी जिल्हयामध्ये उपलब्ध असणारी सर्व संसाधने, प्रविण प्रशिक्षक, संसाधन व्यक्ती, विविध प्रशिक्षण संस्था यांचा सुयोग्य व प्रभावीपणे वापर करणे.
५. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांर्तगत तालुक्यास उपलब्ध होणाऱ्या निधीमधून उदिष्टानुसार व मार्गदर्शक सूचनांनुसार तालुक्यातील प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करणे.
६. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत मंजूर उपक्रमासाठी खर्च केलेल्या निधीचे लेखापरिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा परिषदेस सादर करणे.
७. तालुक्यातील मंजूर सर्व उपक्रमांची अंमलबजावणी करून नियमितपणे आढावा घेवून सनियंत्रण करणे.
८. तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे.
९. तालुका स्तरावर कार्यरत असलेले तालुका प्रकल्प व्यवस्थापन कक्ष व पेसा कर्मचारी यांच्या कामकाजामध्ये समन्वय साधून यासाठी उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा एकत्रितरित्या पुरेपुर वापर करणे.
१०. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत उपलब्ध निधीचे स्वतंत्र हिशेब, लेखे ठेवणे, तालुकास्तरावर लेखापरिक्षण करून घेणे, तालुक्याचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हयास सादर करणे.
११. विहित केलेले सर्व भौतिक व आर्थिक अहवाल जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे (DPMU) विहीत मुदतीत सादर करणे.
१२. प्रशिक्षण उपक्रमांशिवाय पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत मंजूर असलेल्या इतर उपक्रमांची अंमलबजावणी व सनियंत्रण करणे.
१३. केंद्र शासनाने विकसित केलेल्या विविध संगणक प्रणालींचा परिणामकारक वापर करून त्यामध्ये माहिती वेळोवेळी अद्ययावत करणे.
१४. राज्य व्यवस्थापन कक्ष - पंचायतराज (SMU-PR) ने सोपविल्यानुसार इतर कामकाज करणे.

<u>ब. मनुष्यबळ</u>

| अ. क्र. | पदाचे नाव | नियुक्तीचे स्वरूप | पद संख्या | वार्षिक मानधन मर्यादा (रू.लक्ष) | मानधनाचा स्त्रोत |
|---|---|---|---|---|---|
| १ | तालुका व्यवस्थापक | बाह्ययंत्रणेद्वारे | ३५१ | प्रत्येकी रू. २.८० | अभियनांतर्गत तरतुद |
| २ | लेखा सहाय्यक तथा डाटा इंजिनिअर | बाह्ययंत्रणेद्वारे | ३५१ | प्रत्येकी रू. २.०० | अभियनांतर्गत तरतुद |
| | एकूण | | ७०२ | रू. ०४.८० | |

जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकरीता केंद्र शासनाकडून जिल्हानिहाय रु.४.८० लक्ष इतका निधी प्रती वर्ष उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यामधून उपरोक्त पदांचा खर्च भागविण्यात यावा.

****************

## परिशिष्ट - ७
## दिशादर्शक समिती

सदर समिती मा. मंत्री, ग्राम विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात येईल. या समितीची बैठक दर वर्षी कमीत कमी एकदा घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| मा. मंत्री, (ग्राम विकास विभाग) | अध्यक्ष |
| मा. मंत्री (पाणीपुरवठा) | सदस्य |
| मा. राज्यमंत्री (ग्राम विकास विभाग) | उपाध्यक्ष |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (ग्राम विकास विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (अदिवासी विकास विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नियोजन विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (महिला व बाल विकास विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सामाजिक न्याय) | सदस्य |
| महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, पुणे. | सदस्य |
| सहसचिव/उपसचिव, (पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान) ग्राम विकास विभाग | सदस्य |
| संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, पुणे. | सदस्य |
| पंचायतराज क्षेत्रात काम करणाऱ्या २ प्रतिष्ठित व्यक्ती (मा. अध्यक्षाद्वारे नामनिर्देशित केले जातील) | सदस्य |
| सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतीमधून निवडून आलेले २ प्रतिनिधी (मा. अध्यक्षाद्वारे नामनिर्देशित केले जातील) | सदस्य |
| सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतीमधून निवडून आलेले २ महिला प्रतिनिधी (मा. अध्यक्षाद्वारे नामनिर्देशित केले जातील) | सदस्य |
| २ जिल्हा परिषद अध्यक्ष (रोटेशनद्वारे) | सदस्य |
| २ पंचायत समिती अध्यक्ष (रोटेशनद्वारे) | सदस्य |
| संचालक (पंचायत राज/ राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान), पुणे | सदस्य सचिव |

### समितीचे कार्य

१. राज्यघटनेच्या ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार पंचायतराज संस्थांकडे विविध विषय, कर्मचारी व निधीचे हस्तांतरण करण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेणे.
२. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाच्या अपेक्षित फलनिष्पत्तीच्या दृष्टीने नियंत्रण ठेवणे.
३. अभियानांतर्गत उपक्रमांना शासनाच्या प्राधान्यक्रमानुसार दिशा देणे.

********************

## परिशिष्ट - ८
## राज्य सुकाणू समिती

ही समिती मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात येईल. या समितीची वर्षातून किमान एक बैठक घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| मा. मुख्य सचिव | अध्यक्ष |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (ग्राम विकास विभाग) | सदस्य सचिव |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (अदिवासी विकास विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (नियोजन विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (महिला व बाल विकास विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (शालेय शिक्षण व क्रिडा विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (कृषी विभाग) | सदस्य |
| अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (माहिती व तंत्रज्ञान विभाग) | सदस्य |
| संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, पुणे. | सदस्य |
| संचालक (पंचायत राज/ राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान), पुणे. | सदस्य |

<u>समितीचे कार्य</u>

१. पंचायतराज संस्थांकडे विविध विषय, कर्मचारी, निधीचे हस्तांतरण व विकेंद्रीकरणास वेग देणे.
२. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत विविध उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय साधणे.
३. पंचायतराज संस्थांमधील विविध घटकांच्या क्षमता बांधणीसाठी राज्य शासनाच्या इतर विभागांमार्फत सुरु असलेल्या कार्यक्रमांची सांगड घालणे.

*********************

## परिशिष्ट - ९

## राज्य कार्यकारी समिती

ही समिती अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (ग्रा. वि.) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येईल. या समितीच्या वर्षातून किमान दोन बैठका घेण्यात येतील.

| | |
|---|---|
| मा. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (ग्राम विकास विभाग) | अध्यक्ष |
| सह/उप सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| सह/उप सचिव, मगांग्रारोहयो | सदस्य |
| सह/उप सचिव, सामाजिक न्याय विभाग | सदस्य |
| सह/उप सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| सह/उप सचिव (वित्त), ग्राम विकास विभाग | सदस्य |
| सह/उप सचिव (राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान) ग्राम विकास विभाग | सदस्य सचिव |
| सह/उप सचिव ( पंचायत राज ) ग्राम विकास विभाग | सदस्य |
| संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई | सदस्य |
| संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, पुणे | सदस्य |
| संचालक, (पंचायत राज/ राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान), पुणे. | सदस्य |

**समितीचे कार्य**

१. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाची अंमलबजावणी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रभावीपणे करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.
२. पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाचे वार्षिक कृती आराखडयांना मान्यता देऊन अंतिम मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे पाठविणे.
३. अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पंचायतींना तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे.
४. केंद्र शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीच्या प्रमाणात ४०% राज्य हिस्सा उपलब्ध करून देणे.
५. अभियानांतर्गत भौतिक व आर्थिक साध्याचा आढावा घेवून सनियंत्रण करणे.
६. अभियानांतर्गत आवश्यक ते सर्व वित्तीय व इतर निर्णय घेणे.
७. अभियानांतर्गत बाह्ययंत्रणेने नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मानधन, नियुक्तीच्या अटी / शर्ती व प्रशासकीय धोरण ठरविणे.

*****************

## परिशिष्ट - १०

### जिल्हा सनियंत्रण समिती

ही समिती मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येईल. या समितीची बैठक तीन महिन्यातून एकदा घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | सह अध्यक्ष |
| प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं.) | सदस्य |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) | सदस्य |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छता व पाणी पुरवठा) | सदस्य |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) | सदस्य |
| प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन) | सदस्य |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.ग़ां. ग्रा.रो.ह.यो.) | सदस्य |
| समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| कृषी विकास अधिकारी | सदस्य |
| जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | सदस्य |
| जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| कार्यकारी अभियंता (बांधकाम, पाणी पुरवठा व लघुपाटबंधारे) | सदस्य |
| प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य |
| शिक्षण अधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) | सदस्य |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | सदस्य सचिव |
| जिल्हा व्यवस्थापक, पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान | सदस्य |
| प्राचार्य, जिल्ह्याशी संलग्न असलेले ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र | सदस्य |
| प्राचार्य, जिल्ह्याशी संलग्न असलेले पंचायतराज प्रशिक्षण केंद्र | सदस्य |
| प्राचार्य, जिल्ह्याशी संलग्न असलेले संयुक्त प्रशिक्षण केंद्र | सदस्य |

#### समितीचे कार्य

१. जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी जिल्हास्तरावरील विविध विभाग प्रमुखांचा सहभाग वाढवून समन्वय साधणे.
२. अभियानांतर्गत उपक्रमांची मार्गदर्शक तत्वानुसार अंमलबजावणी होत असल्याची खात्री करणे.
३. अभियानाच्या भौतिक व आर्थिक प्रगतीचा नियमितपणे आढावा घेवून सनियंत्रण करणे.
४. अभियानांतर्गत विविध उपक्रमांसाठी आवश्यक असलेली जिल्ह्यातील सर्व संसाधनांचा पुरेपूर वापर करण्यासाठी संबंधित घटकांशी समन्वय साधणे.
५. जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींचे ग्रामपंचायत विकास आराखडे, पंचायत समिती विकास आराखडे व जिल्हा परिषद विकास आराखडा केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तयार करून मुदतीत ई ग्राम स्वराज पोर्टलवर अपलोड करणे.
६. केंद्र शासनाने विकसित केलेल्या विविध संगणक प्रणालींचा परिणामकारक वापर करून त्यामध्ये माहिती वेळोवेळी अद्ययावत करणे.

********************